साक्षात

# चढ-उतार पाहता फक्त दागि

**सोन्याच्या भावात मोठ्या प्रमाणावर फेरफार होण्याची शक्यता सर्वांनीच गृहित धरली आहे; परंतु तरीही सोन्याची खरेदी हवीच असे ग्राहकच नव्हे तर या क्षेत्रातले तज्ज्ञही सांगत आहेत. 'रिद्धीसिद्धी बुलियन्स लिमिटेड'चे संचालक मुकेश कोठारी यांच्याशी केलेली चर्चा**



**■ अमेरिकी डॉलरच्या तुलनेत रुपया सातत्याने घसरत आहे. या पार्श्वभूमीवर सोन्याची खरेदी कशी होईल, असे वाटते?**

सध्या मला चलनवाढीपेक्षाही महागाईच्या दरात घसरण होण्याची किंवा डिफ्लेशनची अधिक भीती वाटते आहे. अशी परिस्थिती निर्माण झाली की मग लोक डॉलर विकत घेण्याच्या पाठीमागे लागण्याची शक्यता आहे. रुपया घसरत असल्याने डॉलर विकून अधिक पैसे मिळवता येण्याची आशा त्यांच्या मनात निर्माण होऊ शकते; परंतु ग्राहक केवळ पैशांवरच अवलंबून राहील असे वाटत नाही. ग्राहक त्याची जोखीम कमी करण्यासाठी तरी या वर्षी सोन्याची खरेदी करेल. सोन्याचे दागिने खरेदी करण्यापेक्षा ईटीएफसारखे पर्याय अधिक प्रमाणावर चोखळले जातील.

**■ सोन्याची किंमत येत्या काळात काय राहील?**

सोन्याचा भाव सध्या कांहीसा स्थिर आहे. क्वचितप्रसंगी तो खालीदेखील आलेला आहे; परंतु संपूर्ण वर्षाचा अंदाज घेतला तर भारतीय सराफ बाजारात सोने प्रति १० ग्रॅम २८ हजार ते २९ हजार ५०० रुपये या दरम्यान पोहोचण्याची दाट शक्यता आहे.

**■ दागिने आणि गुंतवणूक म्हणून**



**सोने खरेदी करण्याचे प्रमाण काय असावे?**

प्रत्येक माणूस कधीना कधी सोने खरेदी करतोच. ग्राहकाने सोने खरेदी करताना नेहमी सोने विभागून खरेदी करावे. म्हणजे एकूण खरेदीत ४० टक्के खरेदी दागिन्यांची करावी. अन्य ४० टक्के खरेदी सोने, नाणी आणि चिपा या स्वरूपात घ्यावे. उरलेले २० टक्के सोनेखरेदी गोल्ड ईटीएफच्या माध्यमातून करावी. यामुळे सोनेखरेदीचे समाधानही मिळेल आणि सोने विविध रूपांत विकत घेतल्यामुळे गरजेनुसार ते वापरताही येईल. सगळे

# ...न्यांची खरेदी नको!

सोने दागिन्यांमध्ये खरेदी केल्यास दागिने आपण सहसा विकत नाही. ते सौभाग्यलेणे समजले जाते. म्हणून सर्व सोने दागिन्यांच्या रूपात खरेदी करू नये.

■ **या वर्षी किती प्रमाणात सोन्याची विक्री होईल तसेच ईटीएफच्या माध्यमातून किती व्यवसाय निर्मिती होईल?**

गेल्या वर्षी आम्ही, आरएसबीएलने सुमारे २.५ टन सोने खरेदी केले होते. तेवढेच टन सोने गोल्ड ईटीएफच्या माध्यमातून ग्राहकांनी खरेदी केले होते. म्हणजे गेल्या वर्षी ५ टन सोन्याचा व्यवहार झाला. यंदा ईटीएफ व्यवसायात २० ते ३० टक्के वाढ अपेक्षित आहे. नवीन ईटीएफ भांडवल बाजारात दाखल झाल्यामुळे स्पर्धा वाढणार आहे. याचा झाला तर फायदाच होणार आहे.

■ **सर्वसामान्य ग्राहकाला तुम्ही कोणता सल्ला द्याल?**

सोने हे नेहमीच सुरक्षित मालमत्ता मानले गेले आहे. सरकारने भांडवल बाजारासाठी काही पॅकेज वगैरे देऊ केले तर बाजारात हालचाल वेगाने होईल; परंतु सोने-चांदी यांचा बाजार या वर्षी चांगल्या प्रकारे व्यवहार करेल. त्यामुळे प्रत्येकाने कुवतीनुसार सोन्यात गुंतवणूक करायला सुरुवात आजपासूनच करावी.

**– वैभव वझे**